॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

जनसंपर्क विभाग

जळगाव, दि. १० ऑक्टोबर : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथील ज्ञान संसाधन केंद्र आणि व्यवस्थापनशास्त्र प्रशाळेच्या संयुक्त विद्यमाने तसेच एमराल्ड पब्लिशिंग यांच्या सहकार्याने 'वन नेशन, वन सबस्क्रिप्शन – यूजर अवेअरनेस प्रोग्राम' या विषयावर विशेष मार्गदर्शनपर कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

या कार्यक्रमात प्राध्यापक, संशोधक आणि विद्यार्थ्यांना दर्जेदार डिजिटल शैक्षणिक संसाधनांचा प्रभावी वापर करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. विद्यापीठातील संशोधन व अध्यापनाची गुणवत्ता वाढविणे, संशोधकांना दर्जेदार ई-संसाधने उपलब्ध करून देणे आणि उपलब्ध संशोधन साहित्याचा प्रभावी वापर करण्यास प्रोत्साहन देणे, हा या कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश होता.

कार्यक्रमाच्या प्रारंभी ज्ञान संसाधन केंद्राचे संचालक डॉ. चंद्रशेखर वाणी यांनी प्रास्ताविक केले. त्यांनी संशोधन प्रक्रियेत डिजिटल माहिती संसाधनांचे महत्त्व अधोरेखित केले. विद्यापीठातील अध्यापन आणि संशोधन अधिक प्रभावी होण्यासाठी ज्ञान संसाधन केंद्राच्या माध्यमातून विविध यूजर अवेअरनेस व प्रशिक्षणपर उपक्रम सातत्याने राबविण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या प्रमुख मार्गदर्शक व संसाधन व्यक्ती वंदना महाजन यांनी 'वन नेशन, वन सबस्क्रिप्शन' या राष्ट्रीय उपक्रमाची संकल्पना, उद्दिष्टे आणि शैक्षणिक क्षेत्रातील महत्त्व विशद केले. या अंतर्गत उपलब्ध ई-संसाधने आणि संशोधन साहित्याचा उपयोग संशोधन, अध्यापन, साहित्याचा आढावा, संदर्भ साहित्याचा अभ्यास तसेच गुणवत्तापूर्ण संशोधन लेखनासाठी कसा करता येतो, याबाबत त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.

व्यवस्थापनशास्त्राच्या विद्यार्थ्यांसाठी एमरॉल्ड प्लॅटफॉर्मवरील संशोधन लेख, केस स्टडीज आणि अन्य विद्वत्तापूर्ण संसाधनांचा असाइनमेंट, प्रकल्प, संशोधन कार्य व लिटरेचर रिव्ह्यूमध्ये प्रभावी वापर करण्याच्या पद्धती यावेळी स्पष्ट करण्यात आल्या. तसेच नवीन संशोधन विषय निवडणे आणि संशोधनातील उणिवा अथवा संशोधनाच्या संधी शोधण्यासाठी या संसाधनांचा कसा उपयोग करता येतो, याची माहिती देण्यात आली. कार्यक्रमादरम्यान सहभागींच्या विविध प्रश्नांचे निरसनही करण्यात आले.

यावेळी व्यवस्थापनशास्त्र प्रशाळेच्या संचालिका प्रा. मधुलिका सोनवणे, व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. पवित्रा पाटील आणि पदव्युत्तर विभागाचे प्रमुख प्रा. रमेश सरदार यांची प्रमुख उपस्थिती होती.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार धनश्री शिरोडे यांनी मानले.

.....................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: १० ऑक्टोबर, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

**जनसंपर्क अधिकारी करीता**